**उपविभागीय अधिकारी मिरज उपविभाग मिरज**
**कार्यालय, मिरज**
**दूरध्वनी क्र. 0233-2222683** Email ID:sdomiraj@gmail.com

क्रमांक एमएजी/काविं/4361/2026, दिनांक - 23 सप्टेंबर, 2026.

उप विभागीय दंडाधिकारी मिरज उपविभाग, मिरज

## (अंतीम आदेश )

(भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, 2023 मधील कलम 157 नूसार)

**ज्याअर्थी,** पर्यावरण रक्षण समिती, सांगली यांनी दिनांक 10.08.2026 रोजी अर्ज करुन त्यामध्ये मौजे तुंग, ता. मिरज, जि. सांगली येथील भूमी ग्रीन एनर्जी प्रा. लि.च्या वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पामुळे पर्यावरण, शेती व नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याबाबत तक्रार केली आहे. सदर प्रकल्पात बायोमास सोबत RDF म्हणजेच प्लॅस्टिक, कागद व इतर ज्वलनशील कचरा वापरला जात असल्याने प्रदूषण नियंत्रणाची प्रभावी अंमलबजावणी होत आहे का, याची चौकशी करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा उपलब्ध अहवाल व नोटिसांमध्ये प्रकल्पातील प्रदूषण नियंत्रण व सांडपाणी व्यवस्थापनाबाबत त्रुटी निदर्शनास आल्याचे नमूद आहे. प्रकल्पाच्या धुरामुळे द्राक्षे, केळी, भाजीपाला व इतर पिकांवर परिणाम होत असल्याच्या तक्रारी असून कृषी विभागाकडूनही याबाबत निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. सांडपाणी प्रक्रिया न करता ओढ्यात सोडले जाते का, तसेच हवा, पाणी व मातीचे प्रदूषण किती आहे, याचे स्वतंत्र वैज्ञानिक परीक्षण करणे आवश्यक आहे. गेल्या पाच वर्षांतील कचऱ्याचा स्रोत व प्रमाण, RDF-बायोमासचा वापर, भट्टीचे तापमान आणि निर्माण झालेल्या राखेची विल्हेवाट यांचा तपशील तपासण्यात यावा. प्रकल्प परिसरातील कचऱ्याचे साठे तसेच सांगली-आष्टा रोडवरील कचरायुक्त मातीचे कथित डम्पिंग यांची प्रत्यक्ष पाहणी व चौकशी करण्यात यावी. कंपनीला मिळणारी Tipping Fee, गेल्या पाच वर्षांतील वीजनिर्मिती व वीज विक्री आणि संबंधित आर्थिक व्यवहारांची माहिती उपलब्ध करून द्यावी. जलसंपदा/पाटबंधारे विभागाकडे कंपनीची असलेली पाणीपट्टी थकबाकी व त्यावर झालेल्या कारवाईचा तपशीलही तपासण्यात यावा. सर्व बाबींची चौकशी करण्यासाठी तज्ञ समिती स्थापन करून संबंधित अधिकारी, विषयतज्ञ, शेतकरी व स्थानिक नागरिकांच्या सहभागाने करणेत यावी, असे नमूद केलेले आहे.

**ज्याअर्थी,** तुंग गावातील ग्रामस्थानी दिनांक 31.08.2026 रोजी पत्र दिलेले असून त्यामध्ये मौजे तुंग, ता. मिरज, जि. सांगली येथील गट नं. 351 व 375 मध्ये स्थित M/s. Bhumi Green Energy Pvt. Ltd. उद्योगाशी संबंधित घनकचरा डंपिंगचा प्रकार निदर्शनास आला आहे. उद्योग परिसरातून मोठ्या प्रमाणात महानगरपालिका घनकचरा व Legacy Waste विविध वाहनांद्वारे बाहेर घेऊन जात असल्याचे आढळून आले आहे. हा कचरा तुंग, कसबे डिग्रज, सामडोळी तसेच विविध मोकळ्या व खासगी जागांवर टाकला जात असल्याचा संशय आहे.काही ठिकाणी कचऱ्याचा जमीन भराव व सपाटीकरणासाठी वापर करून तो मातीखाली गाडला जात असल्याचे दिसून येते. या मिश्र

Scanned with OKEN Scanner

कचऱ्यामुळे जमीन, भूजल व पर्यावरण प्रदूषणाचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. कचऱ्यातील प्लास्टिक, रबर व इतर ज्वलनशील पदार्थांमुळे दुर्गंधी, आग व विषारी धुराचा धोकाही संभवतो. दि. 29.08.2026 रोजी MH 10 DT 4989 क्रमांकाचा डंपर कचरा वाहतुकीसाठी वापरला जात असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे संबंधित वाहनांचे GPS, CCTV, वजन काटा व वाहतूक नोंदी तपासून कचऱ्याचा स्रोत व अंतिम ठिकाण निश्चित करणे आवश्यक आहे. पुणे महानगरपालिका व सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेकडील कचरा वाहतूक व विल्हेवाटीच्या नोंदींचीही चौकशी करावी. संपूर्ण प्रकरणाची तातडीने पाहणी करून कचरा डंपिंग थांबवावे, पर्यावरणीय तपासणी करावी आणि उल्लंघन आढळल्यास जबाबदार व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करावी, असे नमूद केलेले आहे.

**ज्याअर्थी,** ग्रामपंचायत तुंग यांनी दिनांक 01.09.2026 रोजी पत्र दिले असून, त्यामध्ये तुंग येथील M/s. Bhumi Green Energy Pvt. Ltd. यांच्या Waste-to-Energy प्रकल्पासंदर्भात पर्यावरण, आरोग्य व शेतीवरील कथित दुष्परिणामांबाबत ग्रामसभांमध्ये वेळोवेळी ठराव करण्यात आले आहेत. दि. 24/08/2022 व 26/01/2023 रोजी काळा धूर व प्लास्टिकयुक्त कचरा जाळण्यास बंदी घालण्याबाबत ठराव करण्यात आले. दि. 01/05/2023 रोजी काळा धूर व प्लास्टिकयुक्त कचरा जाळल्यामुळे शेतकरी व ग्रामस्थांचे नुकसान होत असल्याने फौजदारी कारवाई करण्याबाबत ठराव करण्यात आला. दि. 31/08/2026 रोजी कंपनीस यापुढे कोणताही परवाना अथवा ना-हरकत दाखला देऊ नये तसेच कंपनी बंद करण्याबाबत ठराव करण्यात आला आहे, असे नमूद केलेले आहे.

**ज्याअर्थी,** तालुका कृषी अधिकारी यांनी दिनांक 31.08.2026 रोजी पत्र दिले असून, त्यामध्ये दि. 31/08/2026 रोजी तालुका कृषी अधिकारी, मिरज श्री. मिलिंद निंबाळकर व उप कृषी अधिकारी, सांगली-2 श्री. सुधीर यादव यांनी तुंग येथील भूमीग्रीन इनर्जी प्रा. लि. पॉवर प्लांटमुळे प्रभावित शेती क्षेत्राची प्रत्यक्ष प्राथमिक पाहणी केली. पाहणीदरम्यान गट नं. 333, 334, 330 व 328 मधील एकूण विविध पिकांच्या क्षेत्रात पिकांच्या पानांवर काळसर राख आढळून आली असून, प्रकाशसंश्लेषण प्रक्रियेत अडथळा निर्माण झाल्यामुळे पिकांची वाढ खुंटलेली दिसून आली. ऊस पिकाच्या पानांवर व खोडव्यामध्येही राख आढळून आली असून,- संबंधित शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार प्लांटमधून निघणारी राख व धुरामुळे पिकांच्या उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होत आहे. राख व दुर्गंधीमुळे शेतमजूर शेतामध्ये काम करण्यास तयार नसल्याचे तसेच काही शेतकऱ्यांनी शेती क्षेत्र पडीत ठेवल्याचे पाहणीत निदर्शनास आले. तसेच काही शेतकऱ्यांनी द्राक्ष शेतीवर परिणाम होत असल्याने द्राक्ष पिकाऐवजी ऊस पिक घेण्यास सुरुवात केल्याचे नमूद केले आहे. प्राथमिक पाहणीनुसार भूमीग्रीन इनर्जी प्रा. लि. पॉवर प्लांटमधून निर्माण होणाऱ्या राखेमुळे परिसरातील अंदाजे 1 ते 1.50 कि.मी. त्रिज्येतील शेतीपिकांवर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले असून, त्याचा पिकांच्या वाढीवर व उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे प्राथमिक निरीक्षण आहे, असे नमूद केले आहे.

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रक मंडळ यांनी दिनांक 01.09.2026 रोजी पत्र दिले असून, त्यामध्ये भूमी ग्रीन एनर्जी प्रा.लि., गट नंबर 351, तुंग, ता. मिरज, जि.

उप विभागीय दंडाधिकारी मिरज उपविभाग, मिरज.

Scanned with OKEN Scanner

सांगली उद्योग सन 2013-14 मध्ये गट नंबर 351 तुंग गावांमध्ये स्थापन झाला. सदर उद्योग कच्चा माल म्हणून बायोमास व आर डी एफ वापरुन त्यापासून प्रतिदिन 10 मेगावॅट विजनिर्मिती करतो. सदर उद्योगाच्या प्रक्रियेमधून 60 एम. एल डी आद्योगिक सांडपाणी निर्माण होत असून त्यावर प्रक्रिया करुन पुर्नवापरासाठी उद्योगांना सांडपाणी सयंत्रणा बसविलेली आहे. तसेच सदर उद्योगाच्या धुरांड्यामधून निघणा-या धुरावर नियंत्रण ठेवण्याकरिता उद्योगाने डस्ट कलेक्टर फॉलोड बाय वेट स्क्रबर हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा बसविलेली आहे. सदर उद्योगास बायोमास व आर डी एफ वापरुन त्यापासून प्रतिदिन 10 मेगावॅट विजनिर्मिती करण्याकरिता दिनांक 30.10.2024 नुसार म. प्र. नि. मंडळाकडून अटी व शर्तीच्या अधिन राहून समंत्ती पत्र देण्यात आलेले आहे. त्याची वैधता दिनांक 31.08.2027 पर्यत आहे. उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, सांगली यांचेकडे वेळोवेळी प्राप्त होणा-या तक्रारीच्या अनुषंगाने तसेच इतर पाहणी दरम्यान आढळलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने म.प्र.नि. मंडळाकडून वेळोवेळी कारवाई करण्यांत येते. त्याबाबतचा संक्षिप्त अहवाल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | केलेल्या कायरवाईचा तपशील | दिनांक |
|---|---|---|
| 1 | ताकिद पत्र | 14.03.2023 |
| 2 | प्रस्तावित आदेश | 28.03.2023 |
| 3 | अंतरिम आदेश | 11.05,2023 |
| 4 | जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, 1974 मधिल कलम 33 अ अंतर्गत निर्देश | 01.04.2024 |
| 5 | प्रस्तावित आदेश | 20.03.2025 |
| 6 | अंतरिम आदेश | 01.07.2025 |

उप विभागीय दंडाधिकारी मिरज उपविभाग, मिरज.

उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली यांचेकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पाहणी करुन आढळलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने पुढील कारवाईचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवणे एवढेच अधिकार असल्या कारणाने वेळोवेळी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सदर उद्योगाची पाहणी करुन कारवाईचा प्रस्ताव वरिष्ठ पाठविण्यांत आलेले आहेत. त्या अनुषंगाने वरिल नमुद तक्त्यामध्ये दर्शविलेल्या कारवाई वरिष्ठ कार्याल्याकडून करण्यांत आलेल्या आहेत. तसेच नजीकच्या काळामध्ये जल व हवा प्रदूषणाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 28.07.2026 व 19.08.2026 रोजी करण्यांत आलेल्या पाहणी दरम्यान आढळलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने पुढील योग्य ती कारवाई करण्यांकरिताचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यांत आलेला आहे. त्यामुळे वेळोवेळी प्राप्त तक्रारीच्या व आढळलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने म.प्र.नि. मंडळाकडून वेळोवेळी कारवाई करण्यांत आलेली आहे, असे नमूद केलेले आहे.

**ज्याअर्थी**, तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती मिरज यांनी भूमि ग्रीण एनर्जी प्रायव्हेट लिमीटेड यांनी भेट देऊन अहवाल सादर केलेला असून त्यामध्ये सदर कंपणीस समडोळी, बेडग व पुणे येथून प्लॉस्टीक कचरा आणला जात असलेचे व सदरचा

कचरा पत्रा शेड खाली उघडयावर साठवूणक करुन कच-याचा वास व दुगंधी येत असलेचे नमूद केलेले आहे. तसेच आजुबाजूला माशांचे प्रमाण असलेचे देखील नमूद केलेले आहे. तसेच सदर कंपणीने आरोग्य विषयक नाहरकत दाखला सन 2013 मध्ये काढलेला असलेचे व आजंतागायत नुतणीकरन केले नसल्याची बाब नमूद केलेली आहे. सदर कंपणीच्या कपाऊंड (संरक्षक भिंत) जवळ गटारीमध्ये पावसाचे पाणी साचून त्यामध्ये डास अळी आढळून आलेचे नमूद केलेले आहे.

**ज्याअर्थी,** ज्याअर्थी भूमि ग्रीण एनर्जी प्रायव्हेट लिमीटेड तुंग यांनी दिनांक 01.09.2026 रोजीच्या पत्रान्वये म्हणणे सादर केलेले असून त्यामध्ये सांगली–आष्टा रोडवर राख अथवा इतर वस्तूंचे स्वतःहून डम्पिंग केले जात नसून शेतकरी व व्यावसायिक व्यक्ती स्वतःच्या वाहनाने राख/फ्लाय ॲश घेऊन जात असल्याचे नमूद केले आहे.कंपनीमध्ये निर्माण होणारी फ्लाय ॲश वीटभट्टी व्यावसायिकांकडून वापरली जात असून त्याबाबतचे GPS छायाचित्रे जोडण्यात आली आहेत. कंपनीमध्ये वापरण्यात येणारा RDF हा कृष्णा ग्रीन एनव्हायर्न सोल्युशन्स व भूमिग्री एनर्जी, पुणे या कंपन्यांकडून घेतला जात असून पुणे व सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेकडून कचरा घेतला जात नसल्याचे स्पष्ट केले आहे. RDF सोबत राईस हस्क, सोया हस्क व बगास यांचा बायोमास फ्युएल म्हणून वापर केला जात असून त्यांची कॅलरीफिकव्हॅल्यू कंपनीकडून तपासली जाते. RDF व बायोमासचा संयुक्त वापर करून भट्टीचे तापमान 750°C ते 850°C दरम्यान ठेवले जाते व प्लांटसाठी सुमारे तीन महिन्यांचा कच्चा माल साठवून ठेवण्यात येतो.प्लांटमध्ये निर्माण होणारी वीज MSEDCL ग्रीडला देण्यात येत असूनत्यासाठी Power Purchase Agreement करण्यात आलेला आहे तसेच मागील पाच वर्षांच्या वीज निर्मितीचा तपशील सादर केला आहे.प्लांट तुंग ग्रामपंचायत हद्दीतील गट नं. 351 व 375 मध्ये असून ग्रामपंचायत कर, एन.ए. कर व पाणीपट्टी नियमितपणे भरत असल्याचे संबंधित पावत्यांसह नमूद केले आहे.कंपनीच्या चिमणीचे Stage Monitoring सुरू असून MPCB Environmental Compliance पूर्ण केल्याची कागदपत्रे सादर करण्यात आली आहेत. प्लांटमध्ये तुंग, कसबे डिग्रज, कारंदवाडी, कवठेपिराण व परिसरातील स्थानिक कामगार कार्यरत असून आजपर्यंत कामगारांकडून आरोग्यविषयक तक्रारी प्राप्त झालेल्या नसल्याचे कंपनीने नमूद केले आहे.

ज्याअर्थी, या कार्यालयाकडील सशर्त आदेश क्रमांक एमएजी /4258/2026, दिनांक 15 सप्टेंबर 2026 अन्वये प्रकल्पाच्या अनुषंगाने उदभवणारे समस्या दूर करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना 08 दिवसाच्या आत कराव्यात अन्यथा सदर उदयोग/प्रकल्प बंद करण्यात यावा किंवा अन्य ठिकाणी हलवण्यात यावा. तसेच सदर आदेशाविरोधात काही आक्षेप असल्यास आपण माझ्या समक्ष दि. 21.09.2026 रोजी सकाळी 11.00 वा. उपस्थित राहून आदेश कायम का करण्यात येवु नये ? याचा खुलासा सादर करावा असे भूमि ग्रीण एनर्जी प्रायव्हेट लिमीटेड तुंग असे आदेशित केलेले आहे. तथापि, भूमि ग्रीण एनर्जी प्रायव्हेट लिमीटेड तुंग यांचे प्रतिनिधी यांनी दिनांक 21.09.2026 रोजी समक्ष उपस्थित राहून दिनांक 01.09.2026 रोजी दिलेले म्हणणे ग्राहय धरणेत यावे, असे नमूद केलेले आहे.

उप विभागीय दंडाधिकारी मिरज उपविभाग, मिरज

Scanned with OKEN Scanner

आणि त्याअर्थी, सदर प्रकरणातील अर्ज, अहवाल व म्हणणे प्रमाणे खालील परिस्थीती निर्माण झालेचे दिसून येते

1. मौजे तुंग येथील M/s. Bhumi Green Energy Pvt. Ltd. प्रकल्पाबाबत पर्यावरण, शेती, हवा, पाणी, माती व नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याच्या तक्रारी विविध स्तरांवरून प्राप्त झालेल्या आहेत. सदर तक्रारी एकाच स्वरूपाच्या नसून, विविध व्यक्ती व संस्थांकडून सातत्याने करण्यात आलेल्या आहेत.
2. तालुका कृषी अधिकारी यांच्या दिनांक 31.08.2026 रोजीच्या प्राथमिक पाहणीमध्ये प्रकल्प परिसरातील शेतीपिकांच्या पानांवर काळसर राख आढळून आल्याचे तसेच पिकांच्या वाढीवर व उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. त्यामुळे प्रकल्पामुळे शेतीवर परिणाम होत असल्याची बाब केवळ तक्रारीपुरती मर्यादित न राहता संबंधित विभागाच्या प्रत्यक्ष पाहणीमध्येही निदर्शनास आलेली आहे.
3. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून सदर उद्योगाविरुद्ध यापूर्वी विविध टप्प्यांवर ताकीदपत्र, प्रस्तावित आदेश, अंतरिम आदेश व जल अधिनियमांतर्गत निर्देश जारी करण्यात आलेले आहेत. तसेच सन 2026 मध्येही प्रकल्पाची पाहणी करून त्रुटींच्या अनुषंगाने पुढील कार्यवाहीचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात आल्याचे कळविण्यात आले आहे.
4. कंपनीने प्रकल्पामध्ये प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक यंत्रणा कार्यरत असल्याचे व पर्यावरणीय अनुपालनाची कागदपत्रे सादर केल्याचे नमूद केले आहे. तथापि, दुसरीकडे MPCB च्या पाहणीमध्ये त्रुटी आढळल्याचे व पुढील कार्यवाहीचा प्रस्ताव सादर केल्याचे नमूद आहे. त्यामुळे कंपनीचे म्हणणे आणि संबंधित विभागांचे निरीक्षण यामध्ये विसंगती दिसून येते.
5. तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती मिरज यांनी भूमि ग्रीन एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीस भेट देऊन सादर केलेल्या अहवालानुसार, सदर कंपनीकडे समडोळी, बेडग व पुणे येथून प्लास्टिक कचरा आणला जात आहे. सदर कचरा पत्राशेडखाली उघड्यावर साठविला जात असल्याने कचऱ्याचा वास व दुर्गंधी येत असल्याचे तसेच परिसरात माशांचे प्रमाण वाढल्याचे नमूद केले आहे. कंपनीने सन २०१३ मध्ये आरोग्यविषयक नाहरकत दाखला घेतला असून, त्याचे आजतागायत नूतनीकरण केलेले नसल्याचे आढळून आले आहे. तसेच कंपनीच्या संरक्षक भिंतीजवळील गटारीमध्ये पावसाचे पाणी साचून त्यामध्ये डासांच्या अळ्या आढळून आल्याचे अहवालात नमूद आहे.
6. या कार्यालयाने दिनांक 15.09.2026 रोजीच्या सशर्त आदेशाद्वारे प्रकल्पामुळे उद्भवणाऱ्या समस्या दूर करण्यासाठी 08 दिवसांची मुदत देऊन आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले होते. तसेच अनुपालन न झाल्यास प्रकल्प बंद करण्याबाबत किंवा अन्य ठिकाणी स्थलांतरित करण्याबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आले होते.सदर आदेशाच्या अनुषंगाने कंपनीस दिनांक 21.09.2026 रोजी प्रत्यक्ष उपस्थित राहून आदेश कायम का करण्यात येऊ नये, याबाबत खुलासा सादर करण्याची संधी देण्यात आली होती. तथापि, भूमि ग्रीण एनर्जी प्रायव्हेट लिमीटेड तुंग यांचे प्रतिनिधी यांनी दिनांक 21.09.2026 रोजी समक्ष उपस्थित राहून दिनांक 01.09.2026 रोजी दिलेले म्हणणे ग्राह्य धरणेत यावे, असे नमूद केलेले आहे.

Scanned with OKEN Scanner

7. त्यामुळे उपलब्ध नोंदींनुसार, प्रकल्पामुळे उद्भवलेल्या समस्या दूर करण्यासाठी कंपनीने प्रभावी व समाधानकारक उपाययोजना केल्याचे या कार्यालयाच्या निदर्शनास आलेले नाही. विशेषतः शेतीवरील परिणाम, राख व धूर, घनकचरा व्यवस्थापन, मानवी आरोग्याच्या समस्या व प्रदूषण नियंत्रण यंत्रणेच्या प्रभावी अनुपालनाबाबत समाधानकारक स्थिती सिद्ध झालेली नाही.

त्याअर्थी, वरील प्रकरणातील अर्ज, अहवाल, म्हणणे व अभिप्रायानुसार या निष्कर्षापर्यंत पोहचलो आहे की, सदर उपद्रव हा भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम 152(1) (b) मधील सार्वजनिक उपद्रव या सदराखाली मोडतो व भूमि ग्रीण एनर्जी प्रायव्हेट लिमीटेड यांचा सदर उदयोग/प्रकल्प हा सार्वजनिक आरोग्य व जिवनमानाच्या दृष्टीकोनातून सदर उदयोग बंद करणे आवश्यक आहे. तरी सदरचा उदयोग/प्रकल्प सदर नमूद आदेशातील विविध विभागांनी उपस्थित केलेल्या मुदयांच्या अनुषगांने पुर्तता करत नाहीत तोपर्यंत बंद करावा अन्यथा इतरत्र हलवावा. या न्यायालयाचे क्रमांक /एमएजी/कावि/4258/2026, दिनांक 15 सप्टेंबर 2026 रोजीचा आदेश सुधारीत करुन याव्दारे कायम करण्यात येत आहे. सदर अंतीम आदेश माझ्या सही व शिक्यानिशी आज दि. 23.09.2026 रोजी पारीत करण्यात येत आहे.

(विशाल यादव)
प्र.उपविभागीय दंडाधिकारी
मिरज उपविभाग मिरज

प्रति,

भूमि ग्रीन एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड, तुंग ता. मिरज जि.सांगली

प्रत -

1) मा.जिल्हाधिकारीसो सांगली यांना माहितीसाठी सविनय सादर
2) अपर तहसिलदार सांगली यांनी सदर आदेशाची अमंलबजावणी तात्काळ करुन अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा (आवश्यक असलेस पोलीस विभागाची मदत घ्यावी)
3) पोलीस निरीक्षक, सांगली ग्रामीण पोलीस ठाणे
4) गट विकास अधिकारी मिरज यांना माहिती तथा उचित कार्यवाहीसाठी
5) ग्रामपंचायत अधिकारी ग्रा.पं. तुंग यांना माहिती तथा उचित कार्यवाहीसाठी
6) पर्यावरण रक्षण समिती कष्टक-यांची दौलत, 1517, पंचमुखी मारुती रोड, खनभाग सांगली

प्रत - ग्राम महसूल अधिकारी तुंग ता.मिरज /मंडल अधिकारी कसबे डिग्रज

Scanned with OKEN Scanner